IYBA XY9DA0 Marathi

प्र. १ अ) "'अनुभव समृध्दता' हा प्रवासवर्णनाचा गाभा असतो", सविस्तर चर्चा करा. २०

किंवा

आ) प्रवास वर्णन म्हणजे काय ते सांगून मराठी साहित्यातील गाजलेल्या प्रवास वर्णनांचा आढावा घ्या.

प्र. २ अ) "'नाद अंतरीचा-श्रीलंका' हे प्रवासवर्णन म्हणजे एका डोळस पत्रकाराने केलेली अभ्यासयात्रा आहे", या विधानाचा सोदाहरण आढावा घ्या. २०

किंवा

आ) "जमिनीतल्या पाण्याचा काटकसरीने वापर करून कल्पकतेने आणि श्रमनिष्ठेने शेती फुलवणारा श्रीलंकेतील माणूस 'नाद अंतरीचा-श्रीलंका' या प्रवासवर्णनाच्या केंद्रस्थानी सतत राहिला आहे", या विधानाचा सोदाहरण परामर्श घ्या.

प्र. ३ अ) 'भूमी चं विभाजन झालं म्हणून इतिहासाचं, संस्कृतीचं विभाजन होत नसतं' हे लेखिकेने कोणत्याप्रकारे मांडले आहे हे सादर स्पष्ट करा. २०

किंवा

आ) लेखिका मनीषा टिकेकर यांनी 'कुंपणापलीकडला देश-पाकिस्तान' या पुस्तकातून त्यांना जाणवलेला पाकिस्तान कसा मांडला आहे हे सविस्तर लिहा.

प्र. ४) खालीलपैकी प्रत्येक गटातील कोणतीही एक टीपा लिहा. ३०

अ) १) मराठी प्रवास वर्णने

किंवा

२) प्रवास-एक वाङ्मय प्रकार

ब) १) श्रीलंकेतील पेहराव उत्सव

किंवा

२) जाफना-तामिळी आणि सिंहली यांच्या संघर्षाचे क्षेत्र

क) १) लेखिकेचे पाकिस्तान मध्ये झालेले आदरातिथ्य

किंवा

२) पाकिस्तान मधील शैक्षणिक वातावरण

प्र. ५) खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. १०

१) 'नाद अंतरीचा' या संग्रहात एकूण किती लेख आहेत?
२) श्रीलंकेतील दोन मुख्य भाषा कोणत्या?
३) श्रीपाद ची पावले कोणत्या देवांसंदर्भात महत्त्वाची आहेत?
४) पुरोवालियाचा राजवाडा कोणत्या राजासंदर्भात व्यक्त झालेला आहे?
५) कारगीलचे पडसाद कधी वाजायला लागले?
६) पाकिस्तानमधील आंतरराष्ट्रीय अभ्यास विभागाच्या प्रमुखाचे नाव काय?
७) कुणाच्या काळात लाहोरची भरभराट झाली?
८) कनीर मेघजी कोणत्या गेस्ट हाऊसचे मालक आहेत?

19

---